# परसातील कुक्कुट पालन यशोगाथा

# गावाचे नाव :— आपोती बु., ता.जि. अकोला

अकोला क्लस्टर मधील आपोती बु. या गावातील ७१७ लोकसंख्येपैकी एकुण १४० अल्प,अत्यल्प, भुमिहीन लाभार्थीची निवड कृषीसमृध्दी प्रकल्पासाठी करण्यात आली. या गावामध्ये मजुरी हा व्यवसाय करणारे लाभार्थी जास्तीत जास्त आहेत. त्यांना महिण्यातुन २० दिवस १५० रू.प्रमाणे रोजगार उपलब्ध होतो. दरमहा सरासरी त्यांना रू. ३००० पर्यत मासीक उत्पन्न मिळते.

प्रकल्पाच्या माध्यमातुन परसातील कुक्कुट पालन या विषयावर लाभार्थ्यांना संस्थेचे उपप्रकल्प व्यवस्थापक, व जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष अकोला चे पदाधिकारी यांनी गाव विकास समितीची सभा बोलावुन माहिती दिली. गाव विकास समितीने गरजु व इच्छुक लाभार्थ्यांची निवड केली. व्यवसायाबदल फारशी आवड तसेच आर्थिक जबाबदारी स्विकारण्याची मानसिक तयारी नसल्यामुळे तेवढे लाभार्थी तयार झाले नाहीत. तरीही अकोला क्लस्टर मधुन एकुण ३०० लाभार्थी या व्यवसाय करण्यास तयार झाले.





एका कुटुंबाला १० पक्षाचे एक युनिट या प्रमाणे ३०० लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. पैकी आपोती बु. या गावामध्ये एकुण २२ लाभार्थ्यांना २२० पक्षी देण्यात याले. ५ ते ६ महिण्यानंतर सरासरी एका कुटुंबास एका महिण्यामध्ये १४० अंडी मिळत असुन सरासरी १०रू प्रमाणे १४००रू. अंडयापासुन व सरासरी १५००रू. उत्पन्न मासापासुन मिळत असुन एकुण मासीक उत्पन्न २९००रू. प्रत्येक कुटुंबाला मिळणे चालु झाले. त्यामुळे त्याच्या आर्थीक परिस्थती सुधारण्यास हातभार लागला.



मागील वर्षाचा लाभार्थ्यांचा कुक्कुटपालन व्यवसायातुन मिळालेले उत्पन्न व त्यांना लागणारा खर्च पाहुन प्रत्येक गावातुन जास्त लाभार्थी या व्यवसायसाठी इच्छुक आहेत. या वर्षी एकुण ५१४ लाभार्थी हा व्यवसाय करण्यास तयार झाले आहेत.

आज रोजी कुक्कुट पालन व्यवसाय म्हणुन ३०० लाभार्थी आहेत. प्रत्येक गावात कमी लाभार्थी असल्याकारणाने अंडे व कोंबडया गावामध्येच मासासाठी विकल्या जाते. प्रती अंडे १०रू. प्रमाणे व मासासाठी ३५०रू प्रती किलोप्रमाणे विकल्या जाते. त्यामुळे आतापर्यंत गावाच्याबाहेर विकण्याची गरज भासली नाही. परंतु यावर्षी जास्त लाभार्थी या व्यवसायाकडे वळले असुन त्याकरीता अंडे व मास एकत्रितपणे विक्रीची व्यवस्था प्रकल्पाच्या माध्यमातुन उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे.

सुरूवातीला क्लस्टर मधुन या व्यवसायाकरीता मोठया मुश्कीलने ३०० लाभार्थी तयार झाले परंतु आज रोजी या व्यवसायामधुन कुटुंबाला जो आर्थीक फायदा होत आहे हे पाहुन इतर कुटुंबसुध्दा या व्यवसायाकडे हळुहळु तयार होत आहेत. एकंदरीत या व्यवसायाकरीता आज रोजी ५१४ लाभार्थी कुटुंब तयार झाले असुन त्यांना सुध्दा या व्यवसायामधुन लाभार्थी कुटुंबाला आर्थिक प्रति लाभार्थी सरासरी प्रति महिना २ ते ३ हजार रूपये उत्पन्न मिळत आहे.